सत्र खटला क्र. ९५/२०२५

सरकार –वि– मोहसिनअलीशहा
नि.क्र.२४

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक –८

मी शपथेवर खरे सांगतो की,

नांव — मंगल बबन इंगळे

वय– ३५ वर्षे, धंदा – व्यापार

रा. इंदिरा नगर, बुलडाणा ता.जि. बुलडाणा

<u>सरतपास सरकार तर्फे श्री. व्ही.एल. भटकर, सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत.</u>

०१. दि. २५.०५.२०२४ रोजी मी तात्पुरता सफाई कामगार म्हणून नगर परीषद, बुलडाणा, येथे कार्यरत होतो. त्यादिवशी माझे समक्ष कोणतीही घटना झाली नाही. असे काही घडले नाही की, त्यादिवशी मी फिर्यादी–खरात यांचे सोबत अतिक्रमण हटविण्याचे मोहीममध्ये हजर असतांना, या आरोपींना त्यांचे अतिक्रमण हटविण्यास सांगीतले असता त्यांनी नकार दिला. असे झाले नाही की, त्यांनी माझे समक्ष शेख जाकीर तसेच शिवराम बेंडवाल यांचेशी लोटपाट करुन फिर्यादीचे अंगावर मारण्यासाठी धाऊन गेले. प्रस्तुतच्या प्रकरणात मला पोलिसांनी विचारपुस केली नव्हती व बयान सुध्दा नोंदवीले नव्हते.

<u>प्रस्तुतचा साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने, सरकारी वकीलांनी साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>
<u>उलटतपास सरकारी वकील श्री. वही.एल.भटकर यांचे मार्फत.</u>

०२. हे खरे नाही की, दि. २५.०५.२०२४ रोजी मी तात्पुरता सफाई कामगार म्हणून नगर परीषद, बुलडाणा, येथे कार्यरत असतांना, आरोपींना त्यांचे अतिक्रमण हटविण्यास सांगीतले असता त्यांनी नकार दिला. हे खरे नाही की, त्यांनी माझे समक्ष शेख जाकीर तसेच शिवराम बेंडवाल यांचेशी लोटपाट करुन फिर्यादीचे अंगावर मारण्यासाठी धाऊन गेले. माझे पोलीस बयानातील अधोरेखांकित भाग–अ आता मला वाचुन दाखविला. मी पोलीसांना असे सांगितले नव्हते. असे माझे बयानात लिहीण्याचे कारण मी सांगु शकत नाही. हे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपी तर्फे राज शेख, वकील यांचे मार्फत – नाकारले.

उलटतपास पुर्ण. फेरतपास काही नाही.

| | |
|---|---|
| वा.दा.ब. अ.क.क. | समक्ष |
| ASHOK GURUDASMAL SANTANI Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI Date: 2026.03.12 17:43:23 +0530 | ASHOK GURUDASMAL SANTANI Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI Date: 2026.03.12 17:43:30 +0530 |
| (ए. जी. संतानी) | (ए. जी. संतानी) |
| जिल्हा न्यायाधीश क्र. २ | जिल्हा न्यायाधीश क्र. २ |
| बुलडाणा | बुलडाणा |

दिनांक : १२/०३/२०२५.